## जिल्हा निवड समिती, परभणी

जिल्हा परिषद परभणी अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदांमधुन मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक 06 जुलै 2017 रोजीचे निर्णयानुसार रिक्त होणा-या गट-क मधील सरळसेवेची पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहिम 2019 अंतर्गत जाहिरात.

**जाहिरात क्रमांक : 02/2019 दिनांक 27.12.2019**

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.308/16-ब दिनांक 21 डिसेंबर 2019 व ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण 2018/प्र.क्र.226/भाग-2/आस्था 8 दिनांक 24 डिसेंबर 2019 मधील दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा परिषद परभणी अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदामधुन मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक 06 जुलै 2017 रोजीचे निर्णयानुसार रिक्त होणा-या गट-क मधील सरळसेवेची पदे भरण्यासाठीची विशेष भरती मोहिम 2019 अंतर्गत खालील प्रमाणे रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी आवश्यक पात्रता धारण करीत असलेल्या अनुसूचित जमातीच्या जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांकडून आवेदन अर्ज ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील आवेदन अर्जाचा नमुना तसेच सविस्तर जाहिरात www.zpparbhani.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचन करुन पदनिहाय आवेदन अर्ज खालील प्रमाणे नमूद पत्त्यावर आवश्यक त्या स्व/साक्षांकित प्रतीसह पाठवावे.

**-:अर्ज सादर करण्याचे वेळापत्रकः-**

| अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख : दिनांक 06 जानेवारी 2020 सायंकाळी 5.45 वाजेपर्यत |
|---|

अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी 5.45 वाजेनर्यत पोस्टाने/कुरीयर/स्वतःकडून प्राप्त झालेले अर्जच फक्त स्विकारले जातील. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. पोस्टाने / कुरीयरने व अन्य यंत्रणेद्वारे पाठविलेल्या अर्जाच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. तसेच परिक्षेचे वेळापत्रकाचा तपशील www.zpparbhani.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

जिल्हा परिषद परभणी अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी विशेष भरती मोहिम 2019 अन्वये भरावयाच्या पदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | पदाचे नाव | पदसंख्या | अर्ज स्विकारण्याचे स्थळ |
|---|---|---|---|
| 1 | आरोग्य सेवक (महिला) | 01 | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांचे कार्यालय, अधिकारी निवासस्थान परिसर, स्टेशन रोड परभणी |
| 2 | शिक्षण सेवक (मराठी माध्यम) (वर्ग-1 ते 5) | 03 | शिक्षणाधिकारी (प्रा), जिल्हा परिषद परभणी यांचे कार्यालय शिक्षण विभाग (प्रा), जि.प.परभणी, मुख्य इमारत, जिंतूर रोड, जिल्हा परिषद परभणी |
| 3 | शिक्षण सेवक ( उर्दु माध्यम) (वर्ग-1 ते 5) | 01 | शिक्षणाधिकारी (प्रा), जिल्हा परिषद परभणी यांचे कार्यालय शिक्षण विभाग (प्रा), जि.प.परभणी, मुख्य इमारत, जिंतूर रोड, जिल्हा परिषद परभणी |
| | एकुण | 05 | |

**टिप:1. शिक्षण सेवक पदाकरिता उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय दिनांक 23.8.2013, 7.2.2019, शासन शुध्दिपत्रक दि.25.2.2019 मधील नमूद शैक्षणिक व व्यवसायिक अर्हतेसह शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) 55% गुणासह पात्रता प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.**

**2.** भरती प्रक्रियेमधील एकुण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, परीक्षेचा प्रकार यात बदल करणे तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हा निवड समिती परभणी यांना राहतील.

ठिकाण- जिल्हा परिषद परभणी, दिनांक- 27.12.2019

(व्ही.एस.मुळीक)
सदस्य सचिव जिल्हा निवड समिती तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद परभणी

(पृथ्वीराज बी.पी, भा.प्र.से)
सदस्य जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद परभणी

(पी.शिवशंकर, भा.प्र.से)
अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी,
परभणी

Scanned by CamScanner